Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 2 – 2025 Impact Factor: 7.665

UGC CARE I

# प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणीव जागृतीच्या अभ्यासात शिक्षकांचा सहभाग

**मनिषा अरुण पाटे,** संशोधक विद्यार्थी, के. सी. ई. सोसायटीचे शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव

**डॉ. पंकजकुमार शांताराम नन्नवरे,** संशोधन मार्गदर्शक, सहयोगी प्राध्यापक, बी. पी. आर्ट्स, एस. एस. ए. सायन्स व के. के. सी. कॉमर्स महाविद्यालय, चाळीसगाव जि. जळगाव

**डॉ. केतन चौधरी**, सह-मार्गदर्शक, सहाय्यक प्राध्यापक, के. सी. ई. सोसायटीचे शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव

**सारांश**

प्राथमिक शिक्षण हा व्यक्तिमत्त्व विकासाचा पाया मानला जातो. या टप्प्यात विद्यार्थ्यांच्या विचारसरणी, मूल्ये, वर्तन व सामाजिक जाणीव यांचे संवर्धन घडविण्यात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. समाजाशी निगडित असलेल्या विविध घटकांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे हे केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित नसून, प्रत्यक्ष अध्यापन-शिक्षण प्रक्रियेतून, सहशालेय उपक्रमांतून तसेच शिक्षकांच्या वैयक्तिक आचरणातूनही साध्य होते. या पार्श्वभूमीवर सदर संशोधन निबंधाचा उद्देश प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणीव जागृतीच्या अभ्यासात शिक्षकांचा सहभाग शोधून काढणे हा आहे. या शोध निबंधात सामाजिक जाणीव या संकल्पनेचा अर्थ विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक मूल्ये, जबाबदारी, सहकार्य, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, स्त्री-पुरुष समानता, लोकशाही मूल्ये, तसेच नैतिक व मानवी मूल्यांची जाण निर्माण करणे असा घेतला आहे. शिक्षक या जाणीवेच्या घडणीसाठी अध्यापनात विविध तंत्रांचा वापर करतात. गटचर्चा, गोष्टी सांगणे, भूमिकानाट्य, प्रत्यक्ष कृती उपक्रम, समाजोपयोगी कामे, राष्ट्रीय सणांचे आयोजन, स्थानिक समस्यांवर चर्चा, तसेच शाळा व समाज यामधील सुसंवाद वाढविण्यासाठी शिक्षकांची सक्रिय भूमिका अधोरेखित करण्यात आली आहे.

शिक्षकांची जाणीवपूर्वक केलेली प्रयत्नशीलता विद्यार्थ्यांमध्ये सहानुभूती, सहयोगी वृत्ती, सामाजिक जबाबदारी व नैतिक मुल्ये निर्माण करतात. शिक्षक केवळ ज्ञानदाते नसून ते आदर्शवत व्यक्तिमत्त्व घडविणारे मार्गदर्शक असतात. त्यांच्या वर्तनातून विद्यार्थ्यांमध्ये अनुकरणीय संस्कार निर्माण होतात. उदाहरणार्थ, शिक्षक स्वतः पर्यावरणपूरक वर्तन करत असतील तर विद्यार्थीही ते स्वीकारतात. त्याचप्रमाणे सामाजिक उपक्रमांत शिक्षकांचा सहभाग असेल तर विद्यार्थ्यांमध्ये समाजाभिमुख दृष्टी वाढते. सदर अभ्यासातून निष्पन्न झाले की प्राथमिक स्तरावर शिक्षकांचा सक्रिय सहभाग हा विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणीवेच्या वाढीसाठी अत्यावश्यक आहे. शिक्षकांची संवेदनशीलता, अध्यापनातील नाविन्यपूर्ण प्रयोग, तसेच विद्यार्थ्यांशी असलेले भावनिक नाते ही या प्रक्रियेतील महत्त्वाची घटक आहेत. भविष्यात सुजाण, जबाबदार व समाजाभिमुख नागरिक घडविण्यासाठी शिक्षकांचा सहभाग हा केवळ आवश्यकच नाही तर अपरिहार्य आहे.

**मुख्य संबोध:** प्राथमिक शिक्षण, सामाजिक जाणीव, शिक्षकांचा सहभाग, मूल्य शिक्षण, विद्यार्थी विकास


Copyright © | JET Network, All Rights Reserved

## प्रस्तावना

सामाजिक जाणीव हा मुलांच्या शिक्षणाचा महत्त्वाचा घटक आहे. हे त्यांना इतर लोकांचे दृष्टिकोन आणि शक्यतो त्यांच्या गरजा समजून घेण्यास अनुमती देते. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव जागृत करणे म्हणजे त्यांना समाजातील विविध प्रश्न, आव्हाने आणि सांस्कृतिक बदलांबद्दल संवेदनशील बनवणे तसेच त्यांच्यात सहानुभूती, सामाजिक जबाबदारीची भावना आणि समानतेचा आदर वाढवणे होय.सामाजिक जाणीव जागृत करण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात जसे की,सामाजिक न्यायाच्या मुद्यांवर चर्चा, स्वयंसेवा आणि सांस्कृतिक आदानप्रदान यामुळे विद्यार्थी भविष्यात एक जबाबदार नागरिक बनण्यास मदत होते. शिक्षकांची भूमिका त्यात महत्त्वपूर्ण असते.त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या समाजाप्रती असलेल्या जबाबदाऱ्यांची जाणीव होते. स्वयंसेवा कार्यक्रमांमध्ये सहभाग घेऊन विद्यार्थी प्रत्यक्ष समाजाशी जोडले जातात. त्यासाठी शिक्षकांनी सामाजिक समस्यांवर आधारित चर्चासत्रे आणि कार्यशाळा आयोजित केली पाहिजे. तसेच विविध संस्कृती बद्दल माहिती देणारे कार्यक्रम आयोजित केले पाहिजे.शाळांमध्ये सामाजिक कार्याशी जोडण्यासाठी विद्यार्थ्यांना शिक्षकांनी प्रोत्साहन दिले पाहिजे. शिक्षक विद्यार्थी घडवतो. त्यामुळे शिक्षकांनी सामाजिक न्यायाच्या मुद्द्यांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.

## संशोधनाची गरज व महत्त्व

या संशोधनाचे प्रमुख उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव जागृती निर्माण करणे आहे. या संदर्भात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.कारण ते विद्यार्थ्यांना या विषयावर योग्य मार्गदर्शन देऊन त्यांच्यात समाजाविषयी जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी योग्य मार्गदर्शन देऊ शकतात. या संशोधनात शिक्षकांचा सहभाग त्यांच्या प्रशिक्षणाची आवश्यकता तसेच सामाजिक जाणीव जागृती यासाठी उपयुक्त शैक्षणिक वातावरण तयार करण्याचे महत्त्व अभ्यासले जाईल.

## उद्दिष्टे

1. सामाजिक जाणीव जागृतीचा अभ्यास करणे.
2. विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणीव जागृतीचा अभ्यास करणे.
3. विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणीव जागृतीत शिक्षकांचा सहभाग अभ्यासणे.

## गृहीतके

1. विद्यार्थ्यांची सामाजिक जाणीव जागृती शिक्षकांच्या सहभागावर अवलंबून आहे.
2. विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीव जागृती असल्यास सामाजिक जीवनावर सकारात्मक परिणाम होतात.

## संशोधन पद्धती

प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणीव जागृतीच्या अभ्यासात शिक्षकांचा सहभाग या शोधनिबंधासाठी सविस्तर विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करून संशोधनासाठी दुय्यम स्रोत म्हणून पुस्तके, विविध ग्रंथ, दैनिके, नियतकालिके व वेगवेगळ्या वेबसाईटवरील अधिकृत माहिती या श्रोतामार्फत संकलित केली आहे. या दुय्यम सामग्री मधून संकलित माहितीचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करून संशोधक निष्कर्षापर्यंत पोहोचला आहे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 2 – 2025

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

UGC CARE I

**विश्लेषण**

**सामाजिक जाणीव**

सामाजिक जाणीव म्हणजे इतरांच्या भावना, गरजा आणि दृष्टिकोन समजून घेऊन त्यांच्याशी सहानुभूतीपूर्वक संबंध ठेवण्याची क्षमता. यामध्ये स्वतःच्या कृती आणि निर्णयांचा इतरांवर आणि पर्यावरणावर काय परिणाम होतो, याची जाणीव असणे आणि सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी जबाबदारीने वागणे समाविष्ट असते.

**सामाजिक जाणीवेचे मुख्य घटकः**

1. **सहानुभूतीः** इतरांच्या भावना आणि गरजा समजून घेण्याची आणि त्याबद्दल सहानुभूती दर्शवण्याची क्षमता.
2. **सांस्कृतिक विविधताः** वेगवेगळ्या पार्श्वभूमी आणि संस्कृतीतील लोकांचे दृष्टिकोन स्वीकारण्याची आणि समजून घेण्याची क्षमता.
3. **सामाजिक संदर्भ समजून घेणेः** समाज, कुटुंब आणि वर्गातील इतरांशी संबंधित असताना स्वतःच्या कृतींचा इतरांवर होणाऱ्या परिणामाची जाणीव असणे.
4. **जबाबदारीची भावनाः** आपल्या कृतींचा आणि निर्णयांचा इतरांवर आणि पर्यावरणावर होणाऱ्या प्रभावाची जाणीव असणे आणि त्याबद्दल जबाबदारी घेणे.
5. **सकारात्मक कृतीः** सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी इतरांसोबत काम करणे आणि समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेणे.

**सामाजिक जाणीव का महत्त्वाची आहे?**

1. **चांगले सामाजिक संबंधः** यामुळे इतरांशी असलेले संबंध सुधारतात आणि मजबूत होतात.
2. **नैतिक वर्तनः** ही क्षमता नैतिक वर्तनाचा आणि इतरांच्या गरजांचा आदर करण्याचा पाया घालते.
3. **समस्या निवारणः** सामाजिक जाणीव समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी मदत करते.
4. **व्यक्तिमत्व विकासः** सामाजिक जाणीव व्यक्तिमत्वाच्या भावनिक आणि नैतिक विकासासाठी आवश्यक आहे.

**सामाजिक जागृती**

सामाजिक जागृती म्हणजे सामाजिक समस्यांबद्दल आणि महत्त्वाच्या सामाजिक घटकांबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि त्याबद्दल माहिती व शिक्षण देणे. शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, महिलांचे हक्क, बाल संरक्षण यांसारख्या विविध विषयांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी सामाजिक जागृतीचे कार्यक्रम आयोजित केले जातात, जेणेकरून अंधश्रद्धा आणि जुन्या रूढी कमी होऊन समाजात प्रगती होईल.

**सामाजिक जागृतीचे उद्दिष्ट्य**

1. **जागरूकता निर्माण करणेः** लोकांमध्ये सामाजिक समस्या, त्यांचे परिणाम आणि त्यावर उपाययोजनांबद्दल जागरूकता वाढवणे.
2. **शिक्षण आणि माहिती प्रदान करणेः** शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि इतर महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर लोकांना माहिती आणि ज्ञान देणे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

3. **सकारात्मक बदल घडवणे:** समाजात अंधश्रद्धा, जुन्या रूढी आणि गैरसमज दूर करून सकारात्मक बदल घडवून आणणे.
4. **समुदायाला सक्षम करणे:** लोकांना त्यांच्या हक्कांबाबत आणि जबाबदाऱ्यांबद्दल जागरूक करून त्यांना सक्षम बनवणे.

**सामाजिक जागृतीची उदाहरणे**

1. **महाराष्ट्र शासनाच्या मोहिमा:** महाराष्ट्र शासनाने स्वच्छतेसाठी आणि उघड्यावर शौचास जाणे टाळण्यासाठी एलईडी व्हॅनचा वापर करून जनजागृती मोहीम राबवली होती.
2. **सामाजिक संस्थांचे कार्यक्रम:** अनेक स्वयंसेवी संस्था (NGOs) शिक्षण, आरोग्य, बाल हक्क, लिंग समानता आणि पाणी व्यवस्थापन यांसारख्या क्षेत्रांमध्ये सामाजिक जागृतीचे कार्यक्रम आयोजित करतात.
3. **शिबिरे आणि कार्यशाळा:** आरोग्य, स्वच्छता, महिलांचे हक्क आणि बाल संरक्षण यांसारख्या विषयांवर समुदायांना शिक्षित करण्यासाठी खास शिबिरे आणि कार्यशाळा घेतल्या जातात.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी शिक्षकांनी सकारात्मक आणि सुरक्षित वातावरण तयार केले पाहिजे, जिथे विद्यार्थी त्यांच्या भावना व्यक्त करू शकतील आणि एकमेकांचा आदर करू शकतील. शिक्षकांनी सामाजिक भावनिक शिक्षण (SEL) दिल्याने विद्यार्थ्यांमध्ये आत्म-जागरूकता, सहानुभूती आणि इतरांशी चांगले संबंध निर्माण करण्याची क्षमता वाढते. वर्गात दयाळूपणा आणि समस्या सोडवण्याची कौशल्ये रुजवून शिक्षक विद्यार्थ्यांना चांगल्या सामाजिक वर्तनासाठी प्रोत्साहित करतात, ज्यामुळे ते अधिक जबाबदार नागरिक बनतात.

**प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी शिक्षकांचा सहभाग**

1. **सुरक्षित वातावरण तयार करणे:** शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी विश्वास आणि स्वीकृतीचे वातावरण तयार केले पाहिजे, जिथे ते त्यांच्या भावना मोकळेपणाने मांडू शकतील.
2. **सामाजिक भावनिक शिक्षण (SEL) देणे:** विद्यार्थ्यांना स्वतःच्या आणि इतरांच्या भावना समजून घेण्यास, सकारात्मक संबंध निर्माण करण्यास आणि विचारपूर्वक निर्णय घेण्यास शिकवण्यासाठी SEL चा वापर करणे.
3. **आदर्श वर्तन दाखवणे:** शिक्षक म्हणून, त्यांनी दयाळूपणा, सहानुभूती आणि समस्या सोडवण्याच्या कौशल्यांचे उदाहरण घालून दिले पाहिजे.
4. **संवादाला प्रोत्साहन देणे:** विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधणे आणि त्यांना त्यांच्या भावना व्यक्त करण्यास प्रोत्साहित करणे महत्त्वाचे आहे.
5. **सकारात्मक सामाजिक कौशल्ये शिकवणे:** विद्यार्थ्यांना एकमेकांचा आदर करण्यास आणि निरोगी नातेसंबंध राखण्यास मदत करणे.
6. **सामाजिक मूल्यांची शिकवण:** सामाजिक आणि भावनिक शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मूलभूत सामाजिक मूल्ये आणि हक्कांची जाणीव करून देणे.
7. **सामुदायिक सहभाग वाढवणे:** विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव वाढवण्यासाठी शाळा आणि समाजातील विविध घटकांचा सहभाग वाढवणे.

थोडक्यात, शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या सामाजिक आणि भावनिक विकासाचे महत्त्वपूर्ण माध्यम आहेत, जे त्यांना समाजात सक्रिय आणि जबाबदार भूमिका बजावण्यासाठी तयार करतात.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

### निष्कर्ष

1. शिक्षकांनी विविध सामाजिक उपक्रम राबवल्यास विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव जागृती निर्माण होईल.
2. सामाजिक कौशल्ये, पैलू,वैशिष्ट्ये,सामाजिकीकरण यात शिक्षकांनी सहभाग घेतल्यास भावी सुजाण नागरिक निर्माण होईल.
3. शिक्षकास समाजाबद्दल जाण असेल तर विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव जागृती निर्माण करणे शिक्षकास सोयीचे होईल.

### समारोप

प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव जागृती निर्माण करणे ही केवळ अभ्यासक्रमाची जबाबदारी नसून शिक्षकांची सर्वात महत्त्वाची भूमिका आहे. लहान वयात घडवलेली मूल्ये, सवयी आणि दृष्टीकोन हे पुढील आयुष्यभर टिकून राहतात. शिक्षक आपल्या अध्यापनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य, परस्पर आदर, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, समता, लोकशाही मूल्ये यांची बीजे पेरतात. या संशोधनातून असे दिसून येते की शिक्षकांचा सक्रिय सहभाग असेल तर सामाजिक जाणीव जागृती अधिक परिणामकारक होते. वर्गात कथाकथन, गटकार्य, भूमिकानाट्य, प्रात्यक्षिके आणि सामाजिक उपक्रम यांच्या साहाय्याने शिक्षक विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव देऊ शकतात. अशा कृतींमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना जागृत होते. आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत तंत्रज्ञान, स्पर्धा आणि भौतिकतावादी दृष्टिकोनामुळे सामाजिक मूल्यांचे संवर्धन अधिक महत्त्वाचे झाले आहे. त्यामुळे शिक्षकांनी आपल्या कार्यपद्धतीत नाविन्यपूर्ण उपक्रमांचा समावेश करून विद्यार्थ्यांना जागरूक, जबाबदार आणि संवेदनशील नागरिक म्हणून घडवणे आवश्यक आहे. एकूणच, प्राथमिक स्तरावरील सामाजिक जाणीव जागृतीसाठी शिक्षक हा मुख्य घटक आहे. त्यांच्या सक्रिय सहभागामुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक मूल्यांची जडणघडण होऊन समाजाभिमुख, सहृदय आणि जागरूक पिढी निर्माण होऊ शकते.

### संदर्भ

1. कदम, च. प., & चौधरी, ब. अ. (2008). *शैक्षणिक मूल्यांकन.* पुणे: नूतन प्रकाशन.
2. पाटील, वि. द. (2012). *शिक्षणशास्त्राचे मूलतत्त्वे.* पुणे: नूतन प्रकाशन.
3. देशमुख, स. ब. (2016). *शैक्षणिक मानसशास्त्र.* पुणे: विद्या प्रकाशन.
4. शिंदे, म. क. (2015). *शैक्षणिक तंत्रज्ञान.* पुणे: नूतन प्रकाशन.
5. पवार, स. र. (2013). *प्राथमिक शिक्षणशास्त्र.* कोल्हापूर: फडके प्रकाशन.
6. जोशी, र. ग. (2010). *संशोधन पद्धती.* पुणे: डायमंड पब्लिकेशन.
7. कुलकर्णी, अ. प. (2018). *प्राथमिक शिक्षणातील भाषा अध्यापन.* मुंबई: सुवर्ण प्रकाशन.
8. पाटील, ग. र. (2014). *शाळा व समाजशिक्षण.* नागपूर: विद्या निकेतन प्रकाशन.
9. गवई, द. म. (2017). *शालेय शिक्षणातील मूल्यशिक्षण.* औरंगाबाद: ज्ञानदीप प्रकाशन.
10. काळे, ग. मो. (2017). *भावनिक बुद्धिमत्ता.* पुणे: वरदा प्रकाशन.


Copyright © | JET Network, All Rights Reserved